# प्रेसनोट दिनांक २५/०५/२०२३
## सी.एम.ओ चे नावाने फसवणुक करणाऱ्या आरोपीस गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड कडुन अटक

दिनांक- २१/०५/२०२३ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाकडुन हिंजवडी पोलीस ठाणे येथे फिर्याद देण्यात आली आहे की, इसम नामे राहुल राजेंद्र पालांडे हा कोणत्याही शासकिय अधिकारी अथवा कर्मचारी नाही. तसेच तो महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही विभागात कोणत्याही पदावर कर्तव्यावर सुद्धा नाही. तरी सुद्धा त्याने सिम्बॉयोसिस एस.आय.बी.एम पुणे, लवळे, हिंजवडी व बेंगलोर येथे सी.एम.ओ कार्यालयातील व्यक्ती असल्याचे फोन व्दारे सांगुन विद्यार्थ्यांचे ॲडमिशन करुन घेतले. तसेच तो सी.एम.ओ कार्यालयातील असल्याचे भासवण्याकरिता व लोकांची फसवणूक करण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या बोधचिन्ह तो वापरत असलेल्या मोबाईलच्या ट्रू कॉलर प्रोफाईलला तसेच व्हॉट्सअ‍ॅप डि.पी.ला. बोध चिन्ह ठेवले. व त्याखाली सि.एम.ओ. ऑफीस महाराष्ट्र शासन मुंबई मंत्रालय अशी प्रोफाईल बनवुन व्हॉट्सअ‍ॅपचे स्लोगन मध्ये सी.एम.ओ पी.आर.ओ ऑफिस एकनाथ भाई शिंदे मुंबई मंत्रालय महाराष्ट्र शासन असा मजकुर ठेवला आहे. तसेच त्याखाली मुंबई मंत्रालयाचे गुगल लोकेशन ठेवले व बनावट इमेल आयडी ठेवला आहे. तसेच तो महाराष्ट्र शासनाचा कोणताही लोकसेवक नसतांना लोकसेवक असल्याची बतावणी करुन लोकसेवक वापरतो तसे ओळखचिन्ह वापरुन शासनाचे लौकिकास बाधा आणण्याकरिता सदर बोधचिन्हाचा वापर करुन त्याद्वारे विविध शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश मिळविण्यासाठी सदर बोध चिन्हाचा व बनावट नावाचा वापर करुन दबाव आणुन स्वतः चे आर्थिक फायदासाठी विद्यार्थ्यांना संस्थेमध्ये ॲडमिशन मिळुन दिले म्हणुन त्याचे विरोधात हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नंबर-६४०/२०२३ भा.दं.वि.कलम-४१७, ४१९, ४२०, ४६७, ४६८, ४६९, ४७२, ४८४, ४८८, १७०, १७१ सह आय टी ॲक्ट ६६ (सी) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची बाब ही गंभीर स्वरुपाची असल्याने मा. पोलीस आयुक्त सो, यांनी गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड यांना या संदर्भाने तात्काळ कठोर कायदेशिर कारवाई करण्याचे आदेश दिल्याने आरोपी नामे **राहुल राजेंद्र पालांडे, वय ३१ वर्षे, राह-केशवनगर, चिंचवड, पुणे** यास तांत्रिक विश्लेषणाचा उपयोग करुन तात्काळ शिताफीने अटक करण्यात आली असुन मा. न्यायालयाने त्यास दिनांक- २९/०५/२०२३ रोजी पावेतो पोलीस कस्टडी मंजुर केली आहे. पुढील तपास गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड हे करत आहेत.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे
पिंपरी चिंचवड